नि.दि.दा.क्र. ०३/२०२२

नि. ८३ लगत

**उर्वरित उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. डी.जे.जगदाळे यांच्यातर्फे शपथेवर पुढे सुरु –**

हे म्हणणे खरे आहे की माझ्यात व प्रतिवादी क्र. १ असे आमच्यामध्ये वाद मिळकतीबाबत पूर्वीपासूनच वाद आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, माझे वडील मयत झाल्यापासून आमच्यामध्ये सदरील वाद सुरु झाले. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ सुनंदा हिने नामदेव तुकाराम साळुंखे, प्रतिवादी क्र.२ त्याची पत्नी सुनीता व मुलगा रोहित यांच्या विरुद्ध वाठार पोलीस स्टेशनला तिला शिवीगाळ केली, मारण्यास धावून आले व जिवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार दाखल केली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की प्रतिवादी क्र.१ हिने खोटी तक्रार दाखल केली होती. दिनांक २६/०४/२०२१ ला प्रतिवादी क्र.१ सुनंदा हिने माझ्या विरुद्ध, प्रतिवादी क्र.२ विरुद्ध व त्याची बायको व मुलगा अशी आमच्या सर्वाविरुद्ध जमीन वहिवाट करु देत नाही व जमीनीमध्ये पाऊल टाकायचा नाही असे म्हणून शिवीगाळ व मारहाण केल्याची तक्रार वाठार पोलीस स्टेशनला दाखल केली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदरील खोटी तक्रार दाखल केली होती.

हे म्हणणे खरे आहे की आमच्या मौजे पिंपोडे बु. या गावामध्ये तंटामुक्ती समीती आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ हिने आमच्या गावातील तंटामुक्ती समीतीकडे अर्ज केला होता व त्यामध्ये सदरील समीतीने दिनांक २४/०६/२०१० रोजी मला बोलवून घेतले होते व त्यामध्ये मी वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१ असे आम्ही हजर झालो होतो व त्यामध्ये माझ्यात, वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१ असे आमच्यामध्ये वाद मिळकतीबाबत तडजोडी झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की सदरील तडजोडीमध्ये गट नं.२३३६ मधील संपूर्ण मिळकत ही प्रतिवादी क्र.१ हिला दिली होती, त्याप्रमाणे गट नं.१८२४ मधील ४६ आर जमीनीपैकी ४० आर शेतजमीन व ६ आर घरासाठी देखील प्रतिवादी क्र.१ याला दिली होती. त्याचप्रमाणे गट क्र.१११ मधील क्षेत्र ७९ आर देखील प्रतिवादी क्र.१ हिला दिले होते.

हे म्हणणे खरे नाही की गट क्र.१९६९ मधील पूर्ण क्षेत्र माझ्या ताब्यात आहे.

साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदरील क्षेत्र वादी क्र.२ याच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१५४ मधील १० आर क्षेत्र माझ्या ताब्यात आहे.

प्रश्न – गट नं.१८२४ मधील ११ आर जमीन व ७ आर घरासाठी अशी एकूण १८ आर जमीन तुमच्या ताब्यात आहे का

उत्तर – सदरील गटातील ८० आर संपूर्ण क्षेत्र आमच्या ताब्यात आहे.

हे म्हणणे खरे नाही की गट नं.२३०८ मधील ४९ आर क्षेत्र हे वादी क्र.२ नामदेव यांच्या ताब्यात आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदरील क्षेत्र माझ्या वडीलांच्या सर्व वारसांच्या ताब्यात आहे. त्याचप्रमाणे गट नं.२३०७ मधील क्षेत्र १ आर देखील माझ्या वडीलांच्या सर्व वारसांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं.११४ मधील ७८ आर क्षेत्र वादी क्र.२ नामदेवच्या ताब्यात आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदर क्षेत्र देखील माझ्या वडीलांच्या सर्व वारसांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१८२४ पैकी ११ आर शेतजमीन व ५ आर घरासाठी अशी एकूण १६ आर जमीन नामदेवच्या ताब्यात आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की सदरील जमीन माझ्या वडीलांच्या सर्व वारसांच्या ताब्यात आहे.

हे म्हणणे खरे नाही की दावा चालू असताना वाद मिळकतीमध्ये वादी क्र.२ याने घर बांधले. हे म्हणणे खरे आहे की पिंपोडे गावात माझे स्वतःचे घर नाही व मी कधी आलो तर वादी क्र.२ यांच्या घरी राहात असतो. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २६/०७/२०१० रोजी झालेल्या तंटामुक्तीमधील झालेल्या तडजोडीनुसार माझी, वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१ अशा आमच्या वहिवाटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ हिने वाद मिळकतीतील घर हे १९९३ साली बांधले होते. हे मला माहिती नाही की १९९३ साली प्रतिवादी क्र.१ हिने सदरील घरामध्ये लाईट मिटर घेतले होते का?

हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ चे पती सोपान हे आमच्या तिघा भावामध्ये थोरले होते. हे म्हणणे खरे आहे की माझा भाऊ सोपान हे मुंबई येथे माथाडी कामगार म्हणून काम करत होते. हे म्हणणे खरे नाही की माझा भाऊ सोपान याने गट नं.१११ व १८२४ या खरेदी मिळकतीला स्वतःचे पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की सदरील वडीलोपार्जित मिळकतीचे व खरेदी मिळकतीचे अदयापपावेतो वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ही एकटी गावी राहत असल्यामुळे व तिची जमीन

हडपण्याकरीता आम्ही हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की वाद मिळकतीमध्ये प्रवेश करण्यापासून आम्ही प्रतिवादी क्र.१ हिला अटकाव करतो. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

कोरेगाव **(पी.डी.यवतकर)**

दि. १७/०६/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.